# रेल्वे भरती बोर्ड - मुंबई

मंडळ रेल्वे कार्यालयाचे कंपाऊन्ड, पश्चिम रेल्वे,
मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008.

**वेबसाईट:** www.rrbmumbai.gov.in
**दूरध्वनी क्र.:** 022-23090422
**ई-मेल:** asrrb-mum@nic.in
**फॅक्स क्र.:** 022-23090224

## पात्र उमेदवारांसाठी अभिक्षमता परीक्षा निदर्शक जाहिरात

**कोटि क्र. 01** **पद : सहायक लोको पायलट** **के.रो.सू. क्र. : 01/2014**
**(वेतनमान : पीबी ₹ 5200-20200-जीपी. ₹ 1900)**

**दि. 15/06/2014, दि. 29/06/2014 आणि 13/07/2014** रोजी **के.रो.सू. क्र. 01/2014** अंतर्गत सहायक लोको पायलट आणि टेक्निशियन्स या पदांसाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या आधारे जे उमेदवार अभिक्षमता परीक्षेसाठी तात्पुरत्या रित्या पात्र ठरले आहेत, त्याचे निकाल **दि. 17/12/2015** रोजी जाहीर करण्यात आले आहेत. ही अभिक्षमता परीक्षा **दि. 21/01/2016 ते 16/02/2016** या कालावधीत **विवा कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज (नवीन), (डी'मार्ट जवळ), 100 फूट रोड, बोळिंज, विरार (प) - 401 303** येथे घेण्यात येणार आहे.

तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवारांना त्यांनी अर्जात दिलेल्या पत्त्यावर प्रवेशपत्रे पाठविण्यात आली आहेत. पोस्टाने उशीरा व चुकीची पोच झाल्यास रेल्वे भरती बोर्ड जबाबदार राहणार नाही.

अभिक्षमता परीक्षेसाठी तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवारांचे रोल नंबर, परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षेची तारीख इ. माहिती मुंबई रेल्वे भरती बोर्ड, मुंबईच्या अधिकृत वेबसाईट **www.rrbmumbai.gov.in** वर उपलब्ध आहे. तसेच आरआरबी मुंबईच्या नोटीस बोर्डवरही पाहता येतील.

**(1)** तात्पुरते रित्या पात्र ठरलेल्या उमेदवारांना असे सूचित करण्यात येते की सहायक लोको पायलट या पदासाठी घेण्यात येणाऱ्या अभिक्षमता परीक्षेसंबंधी इतर सविस्तर माहिती रीसर्च डिझाईन व स्टँडर्ड्स् ऑर्गनायझेशन ऑफ इंडियन रेल्वेच्या **www.rdso.indianrailways.gov.in** या वेबसाईवर उपलब्ध आहे.

विद्यार्थी कक्ष्यावर पाथची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे: **www.rdso.indianrailways.gov.in → Directorates → Psycho Technical Directorate → Candidates corner at the left side.**

**(2)** **तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवारांनी खालील कागदपत्रे सोबत आणावित अन्यथा त्यांना अभिक्षमता परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.**

**2.1 प्रवेश पत्र :** तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवाराला अभिक्षमता परीक्षेच्यावेळी तपासणीसाठी प्रवेश पत्र सादर करावे लागेल. हे प्रवेश पत्र फक्त त्यावर नमुद केलेल्या संबंधित परीक्षा तारीख व सत्रासाठी वैध आहे. तसेच उमेदवाराने न विसरता लेखी परीक्षेचे कॉल-लेटर सोबत आणावे.

**2.2 आय. डी. प्रमाण :** तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवाराने किमान एक मूळ प्रत (झेरॉक्स किंवा स्कॅन प्रत नसावी) आणि छायाचित्रासह वैध ओळखपत्र (जसे: कॉलेज आय.डी, एम्पलॉई आय. डी., ड्रायविंग लायसन्स, पासपोर्ट, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, आधारकार्ड, ई-आधार, यूआयडी) सादर करावे.

**2.3 दृष्टी प्रमाणपत्र :** तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवाराला मूळ दृष्टी प्रमाणपत्र (जोडपत्र-6 सीईएन मध्ये नमुना जोडलेला आहे) नेत्र-विशारदाने सही केलेले (नेत्र विशारदाचा नोंदणी क्रमांक आणि शिक्क्यासहित) अभिक्षमता परीक्षेच्या वेळी सादर करायचे आहे अन्यथा त्यांना अभिक्षमता परीक्षेला बसता येणार नाही. जे उमेदवार विहित नमुन्यातील फॉर्म-6 प्रमाणे परीपूर्ण दृष्टी प्रमाणपत्राशिवाय परीक्षा केंद्रावर उपस्थित राहतील त्यांना कोणत्याही परिस्थितीत अभिक्षमता परीक्षेला बसू देण्यात येणार नाही. ज्या उमेदवारांची सहायक लोको पायलट पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता नसेल त्यांनी ही परीक्षा देऊ नये. त्यामुळे त्यांच्या टेक्निशियन्स पदासाठीच्या (विकल्प दिला असल्यास) उमेदवारीवर कोणताही परिणाम होणार नाही.

**(3) उपस्थित राहण्याची वेळ :** प्रवेश पत्रात नमूद करण्यात आलेल्या वेळेपूर्वी किमान अर्धा तास तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवाराला परीक्षा केंद्रावर हजर रहायचे आहे

**(4) ठिकाण :** तात्पुरत्या रित्या पात्र उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी अभिक्षमता परीक्षा केंद्राचे ठिकाण आणि तिथे पोचण्याची सोय याची माहिती परीक्षेपूर्वी करून घ्यावी, जेणेकरून उमेदवारांना परीक्षा केंद्रावर वेळेवर पोचता येईल.

निकाल तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापि काही त्रुटी आढळून आल्यास सुधारणा करण्याचे अधिकार रेल्वे भरती बोर्ड स्वत:कडे राखून ठेवत आहे. कोणतीही अस्पष्टता व भुल चुकीसाठी इंग्रजी प्रत ग्राह्य धरली जाईल.

**महत्वपूर्ण : उमेदवारांना सूचित केले जाते की, नोकरी धूर्तांपासून सावध रहा, जे रेल्वेमध्ये नोकरी देण्याची खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करू शकतात. रेल्वे भरती बोर्डाची भरती प्रक्रिया संपूर्ण संगणकीकृत आहे आणि उमेदवारांची नियुक्ती केवळ त्यांच्या योग्यतेच्या आधारावरच केली जाते.**

**RRB/BCT/2015-16/15** **अध्यक्ष**

**ग्राहकांच्या सेवेत, हसत मुखाने**

Sai Advertisers : (H) 18 cms. x (W) 12 cms. = 216 sq.cms.